


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**

स्वत:ला कधीही कमी लेखू नका;
तुमच्या आत्मविश्वासाने
अशक्य गोष्टी सुद्धा
शक्य होऊ शकतात.

वर्ष : ०५ | अंक : ११५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०८ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# गोव्यात गर्दीने तुडुंब भरलेल्या नाइटक्लबला भीषण आगीत २५ जणांचा मृत्यू

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०७, पणजी :** उत्तर गोव्यात गर्दीने तुडुंब भरलेल्या नाइटक्लबला शनिवारी म ध्यरात्रीनंतर लागलेल्या भीषण आगीत २५ जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले. डान्स फ्लोअरजवळ फोडलेल्या फटाक्यांमुळे ही आग लागल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले असून, नियमांची अंमलबजावणी करण्यात सरकारी अधिकाऱ्यांनी हलगर्जी केल्याचेही समोर आले आहे. या आगीत एका महिलेने पती आणि तिघी बहिणींना गमावले. महिलेचा जीव वाचवून तिचा पती तीन मेहुणींना वाचवण्यासाठी पुन्हा आगीत गेला होता, मात्र दुर्दैवाने त्या चौघांपैकी कोणीही परत येऊ शकलं नाही.

गोवा येथे सुट्टीसाठी गेलेल्या दिल्लीतील कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. गाझियाबाद आणि नवी दिल्ली येथील जोशी कुटुंब गोव्यात तीन दिवसांपासून सुट्टीचा आनंद घेत होते. शनिवारी ते 'इळअॅलह डू ठोशे डरपश' या नाईटक्लबला भेट देण्यासाठी गेले. दुर्दैवाने त्यांनी क्लबम ध्ये प्रवेश केल्यानंतर काही मिनिटांतच आग लागली. या आगीत महिलेचे पती विनोद कुमार आणि महिलेच्या तीन बहिणी – अनिता जोशी, सरोज जोशी आणि कमला जोशी अशा चौघांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

आग लागल्यानंतर विनोद कुमार यांनी सर्वात आधी आपली पत्नी भावना जोशी यांना मुख्य प्रवेशद्वारातून बाहेर ढकलले. त्या बाहेर पडल्या, पण त्यांचे पती आणि बहिणी आतच अडकले होते. बायकोच्या तिघी बहिणींना वाचवण्यासाठी विनोद कुमार जीवाची पर्वा न करता पुन्हा आगीत शिरले. भावना बाहेर उभ्या




राहून आपल्या पतीला वारंवार फोन करत होत्या, पण त्यांचा फोन वाजत राहिला आणि प्रतिसाद मिळाला नाही. काही वेळाने जेव्हा मृतदेह बाहेर आणले गेले, तेव्हा त्यांना आपल्या प्रियजनांना गमावल्याची भीषण सत्यता समजली. या घटनेमुळे जोशी कुटुंबाच्या एका आनंदी सुट्टीचे रुपांतर एका भयंकर शोकांतिकेत झालं. ज्या नाईटक्लबमध्ये संगीत आणि हास्याने सुट्टीचा आनंद साजरा करायचा होता, तिथे आता केवळ राख आणि शांतता उरली होती. सुट्टीवर गेलेल्या पाच जणांपैकी भावना जोशी एकट्याच बचावल्या. हॉटेल कर्मचाऱ्यांनी भावना यांना धीर देण्याचा प्रयत्न केला, पण पती आणि बहिणींच्या मृत्यूच्या धक्क्याने त्या सुन्न झाल्या आहेत.

दरम्यान, क्लबचे मुख्य म हाव्यवस्थापक राजीव मोडक, महाव्यवस्थापक विवेक सिंग, बार व्यवस्थापक राजीव सिंघानिया आणि गेट व्यवस्थापक रियांशू ठाकूर यांना पोलिसांनी अटक केली आहे, असे मुख्यमंत्री सावंत यांनी सांगितले. सौरभ लुथ्रा आणि गौरव लुथरा हे नाइटक्लबचे दोन मालक आणि कार्यक्रम आयोजकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सौरभ लुथरा आणि गौरव लुथरा यांनाही लवकरच ताब्यात घेतले जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## प्रेमात अडसर ठरणाऱ्या पतीची निर्घृण हत्या!

## आरोपीला एका तासात अटक; राजुरा पोलिसांची कामगिरी

**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि.०७, राजुरा (चंद्रपूर) :** पत्नीला नेण्यासाठी आलेल्या पतीला पत्नी व तिच्या प्रियकराने ठार केल्याची घटना ५ डिसेंबर रोजी रात्री ८ वाजता राजुरा तालुक्यातील हरदोना गावात घडली. पोलिसांनी या प्रकरणी पत्नी व तिच्या प्रियकराला ताब्यात घेतले आहे. ३० वर्षीय राजेश नारायणलाल मेघवंशी रा. भिलवाडा ( राजस्थान) असे मृतकाचे नाव आहे. मागील वर्षी राजेश मेघवंशी व त्याची पत्नी दुर्गा उर्फ जिया काम करण्यासाठी हरदोना मध्ये आले होते. काही महिन्यांनी राजेश आपल्या पत्नीसह राजस्थान मध्ये आपल्या गावी परतले. हरदोना मध्ये काम करतेवेळी चंद्रप्रकाश मेघवंशी सोबत दुर्गाचे प्रेमसंबंध जुळले होते. प्रेमसंबंधात वेडसर झालेल्या चंद्रप्रकाश व दुर्गा ने सोबत जीवन मरणाच्या आणाभाका घेतल्या होत्या. ६ महिन्सापूर्वी चंद्रप्रकाश ने दुर्गा ला भिलवाडा मधून पळवित राजुरा तालुक्यातील हरदोना मध्ये आणले. याबाबत राजेशने भिलवाडा पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दिली होती. पोलीस तपासात दुर्गा ही जिल्ह्यातील हरदोना गावात असल्याची माहिती राजेशला मिळाली. २ मुली व १ मुलगा आईच्या प्रेमात पोरके व्हायला नको यासाठी राजेश व त्याचा मित्र जगदीश मेघवंशी यांनी हरदोना जायचे ठरविले. राजेश हा हरदोना येथे आपल्या मित्रासह पोहोचला. त्यावेळी चंद्रप्रकाश त्यांना दिसला. तू माझ्या पत्नीला का पळवून आणला असा जाब राजेश ने त्याला विचारला असता दोघांमध्ये यावरुन वाद वाढला. वाद विकोपाला गेल्यावर चंद्रप्रकाश ने दुर्गा ला आवाज दिला. त्यावेळी दुर्गा ने चंद्रप्रकाश च्या दिशेने तलवार फेकली. त्या तलवारीने राजेश च्या डोक्यावर चंद्रप्रकाश ने जबर प्रहार केला. या हल्ल्यात राजेश खाली कोसळला. रक्तबंबाळ अवस्थेत पडलेल्या राजेश चा काही क्षणात मृत्यू झाला. राजुरा पोलिसांना याबाबत माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळ गाठले. काही तासात पोलिसांनी दुर्गा उर्फ जिया व चंद्रप्रकाश मेघवंशी ला ताब्यात घेतले.

## सप्तशृंगीला जाताना एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू, इनोव्हा ७०० फूट खोल दरीत

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०७, नाशिक :** सप्तशृंगीच्या दर्शनासाठी जाताना सुमारे ७०० फूट खोल दरीत इनोव्हा कार कोसळून सहा भाविक जागीच ठार झाल्याची घटना रविवारी दुपारी साडेचार वाजताच्या सुमारास घडली.

मोबाइलच्या टॉर्चमध्ये मृतदेह शोधून बाहेर काढण्याची वेळ आली. नांदुरी ते सप्तशृंग गड घाट रस्त्यातील गणपती मंदिराजवळ अपघात झाला. सर्व भाविक पिंपळगाव बसवंत येथील रहिवासी असून, मृतांमध्ये तीन म हिलांचा समावेश आहे. कीर्ती हिंमतलाल पटेल (वय ५५), रशिलाबेन पटेल (५५), विठ्ठल पटेल (६५), लता विठ्ठल पटेल (६०), पचाण पटेल (७०), मणीबेन पटेल (५५) अशी मृतांची नावे आहेत.

**कसा झाला अपघात?**

पटेल कुटुंब त्र्यंबकेश्वरहून दर्शन घेऊन सप्तशृंगीदेवीच्या दर्शनासाठी जाताना इनोव्हा कारच्या (एमएच १५/बीएन ०५५५) चालकाचा गडाजवळील भवरीनाला धबधबा घाट परिसरातील रस्त्यातील एका वळणावर पुढे जाण्याचा प्रयत्न करताना वाहनावरील ताबा सुटला. घाटाच्या कुमकुवत संरक्षक कठड्याला वाहनाची जोरदार धडक बसल्यानंतर वाहन थेट ७०० फूट दरीत कोसळले.

सप्तशृंगी देवी ट्रस्टचे आपत्ती व्यवस्थापन व्यवस्थेचे पथक, ग्रामपंचायत यंत्रणा, रोप वे ट्रॉलीचे कर्मचारी पथक, नांदुरी ग्रामपंचायत, वन विभाग प्रशासनासह स्थानिक ग्रामस्थांनी मृतदेह बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले. दोरखंड बांधून आपत्ती व्यवस्थापनाचे पथक दरीत उतरले. मोबाइलच्या टॉर्चमध्ये मृतदेह शोधून बाहेर काढण्यात आले.

या वेळी सहा-सात रुग्णवाहिका घाटात दाखल झाल्या होत्या. या वेळी सप्तशृंग गडाचे उपसरपंच संदीप




बेनके व सदस्य राजेश गवळी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गलथान कारभारामुळे ही घटना घडल्याचा आरोप करीत बांधकाम विभागावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली आहे.

**चालक बदलला अन् घात झाला**

कीर्ती पटेल यांच्या कुटुंबीयांचे पिंपळगाव बसवंत येथे सॉ मिल, मार्बलचा व्यवसाय आहे. पिंपळगाव शहरातील मनमिळावू व्यक्ती म्हणून ते प्रसिद्ध होते. पटेल यांच्यासह नातेवाईक व त्यांची पत्नी असे सहा जण इनोव्हा कारमध्ये होते. सकाळी ते त्र्यंबकेश्वरला गेले. तेथून ते नाशिकला आले. नाशिकला द्वारका येथे चालक काही कामासाठी उतरला. त्यामुळे पटेल स्वतः कार चालवत दिंडोरीमार्गे सप्तशृंगी गडावर निघाले, तेव्हा वाटेत हा अपघात झाला.

## केज शहरातील सिनीयर क्रिकेटपटूंचे 'नोस्टॅल्जिक' स्नेह मिलन



**अक्षराज : शिवाजी औसेकर**
**दि.०७, केज :** क्रिकेटच्या मैदानावर आपल्या जबरदस्त खेळीने केज शहराची शान वाढवणाऱ्या सिनीयर क्रिकेट खेळाडूंचे एक आगळेवेगळे आणि उत्साहाचे स्नेह मिलन नुकतेच निसर्गाच्या रमणीय सानिध्यात पार पडले. या स्नेह मिलनात केज शहराच्या जुन्या जाणत्या आणि आपल्या काळात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या खेळाडूंनी एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला, ज्यामुळे एका खास 'नोस्टॅल्जिक' (नॉस्टॅल्जिया) वातावरणाची निर्मिती झाली.

**स्नेह भोजनाचा अस्वाद आणि आठवणींना उजाळा :** हा सोहळा शहरातील ज्येष्ठ खेळाडू शेख जफर यांच्या शेतात मोठ्या उत्साहात पार पडला. सर्व खेळाडूंनी एकत्र येत स्नेह भोजनाचा मनमुराद अस्वाद घेतला. विशेषतः, क्रिकेटच्या मैदानावरच्या थरारक क्षणांची आणि त्या काळात केलेल्या गमती-जमतींची चर्चा रंगली, ज्यामुळे उपस्थितांमध्ये जुन्या काळाच्या आठवणींनी समा बांधला.

**उपस्थित सिनीयर खेळाडू :** या स्नेह मिलन उत्सवाला केज शहराचे अनेक नामांकित सिनीयर खेळाडू उपस्थित होते, ज्यांनी आपल्या खेळाच्या माध्यमातून केज शहराचे नाव मोठे केले आहे. यामध्ये अकबर इनामदार, प्रकाश मुंडे, शेख सिद्दीक भाई,अजिमभाई इनामदार,विजय आरकडे, मनोज मस्के, चांद कादरी, डॉ. शशी केंद्रे, प्रेमजीत हजारे, नय्युम मौजन, बंडू मस्के, विनोद गुंड, अॅड. भागवत ढाकणे, फशी मौजण, शेख जफर, शेख पाशाभाई, शिवाजी घुले, अप्पा हजारे, प्रशांत जाधव, नय्युम मौजन, ताहेर मुल्लसाब,मुजफ्फर सय्यद, अंकुश राऊत, रवि आवटी, शेख खय्युम यांच्यासह अनेक जुने जाणते व उत्कृष्ट खेळाडू हजर होते.

या सर्व सिनीयर क्रिकेट खेळाडूंनी एकमेकांचे अलीकडील जीवनमान आणि अनुभव जाणून घेतले. भविष्यात अशा प्रकारचे स्नेह मिलन नियमितपणे आयोजित करण्यावरही यावेळी चर्चा झाली, जेणेकरून मैदानाबाहेरील हे खास नाते अधिक दृढ होईल.

## देशातील पहिला आयकॉनिक मल्टिपर्पज इनडोअर लाईव्ह एन्टरटेनमेन्ट अरेना उभारण्याच्या प्रक्रियेला सुरुवात

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.०७, नवी मुंबई :** दूरदर्शी नियोजनाद्वारे व विशिष्ट उद्देशाने विकसित करण्यात आलेले नवी मुंबई हे देशाच्या नगर नियोजनाला नवीन दिशा देणारे शहर ठरले आहे. भविष्यातील शहर म्हणून संकल्पित असलेली नवी मुंबई वर्तमानातील शहर म्हणून दिमाखाने झळकत आहे. हे परिवर्तन घडवून आणण्यासह देशातील थेट करमणूक क्रांती (live entertainment revolution) चा केंद्रबिंदू म्हणून नवी मुंबईला नावारूपाला आणत असल्याचा सिडकोला सार्थ अभिमान आहे.

या संदर्भातील एक महत्त्वाचे पाऊल म्हणून देशातील पहिला आयकॉनिक म ल्टिपर्पज इनडोअर लाईव्ह एन्टरटेनमेन्ट अरेना नवी मुंबईमध्ये उभारण्यासाठी सिडकोतर्फे स्वारस्य अभिव्यक्ती जारी करून प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. स्वारस्य अभिव्यक्ती दस्तऐवज दि. ९ डिसेंबर २०२५ पासून ऑनलाइन उपलब्ध असणार असून निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दि.३१ डिसेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत (भारतीय प्रमाण वेळ) आहे.

न्यूयॉर्क येथील मॅडिसन स्क्वेअर गार्डन आणि लंडन येथील ओटू अरेना या बहुउद्देशीय नाट्यगृहांपासून प्रेरणा घेऊन विकसित करण्यात येणारा हा प्रकल्प देशातील करमणूक पायाभूत सुविधांमध्ये नवीन मानदंड प्रस्थापित करणार आहे. रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या संगीतसभा, आंतरराष्ट्रीय क्रीडाविषयक कार्यक्रम, भव्य स्तरावरील सांस्कृतिक महोत्सव आणि आभासी अनुभव (immersive productions) यांच्या आयोजनाकरिता २०,००० प्रेक्षकांसाठी आसन व्यवस्था आणि २५,००० उभे प्रेक्षक इतकी क्षम ता या ठिकाणी असणार आहे. यामुळे हा देशातील पहिला जागतिक दर्जाचा व भव्य क्षमता असणारा इनडोअर अरेना असणार आहे.

नवी मुंबईतील पायाभूत सुविधांचा विकास अत्यंत वेगाने होत असल्याने जागतिक पातळीवरील करमणूक कार्यक्रमांचे यजमानपद भूषवण्यासाठी नवी मुंबई सक्षम झाली आहे. अटल सेतू ट्रान्स-हार्बर लिंक, हाय स्पीड रेल्वे मार्ग आणि नवी मुंबई मेट्रो यांद्वारे अखंड आणि वेगवान कनेक्टिव्हिटी सुनिश्चित झाली आहे.नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाद्वारे करमणूक व्यवस्थापन (लॉजिस्टिक्स), आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलाकारांकरिता परिवहन आणि प्रसार माध्यम उत्पादन क्षमता यांमध्ये क्रांतिकारी परिवर्तन घडून येणार आहे. नेरूळ जेट्टीद्वारे पर्यटन, जलवाहतूक आणि चित्रपट निर्मितीच्या संधींमध्ये वाढ होणार आहे.

फिफा मानकांचे अनुपालन करणाऱ्या चार खेळपट्ट्या आणि ४,००० आसन क्षमतेचे स्टेडियम असणारे खारघर येथील सेंटर ऑफ एक्सलन्स आणि १८ होल्सचे खारघर व्हॅली गोल्फ कोर्स यांनी नवी मुंबईचे क्रीडा व करमणूक क्षेत्रातील स्थान अधिक बळकट केले आहे.

आगामी मेडि सिटी, एज्यु सिटी आणि एरो सिटी प्रकल्पांद्वारे नवी म ुंबईचे एकात्मीक नगर विकास प्रारूप अधिक उठावदार होणार आहे.

उद्योग क्षेत्रातील प्रतिष्ठित हितसंबधींसोबत (Stakeholders) भागीदारी करून जागतिक दर्जाचे ज्ञान व परिचालन क्षमता आणून देशातील करमणूक क्षेत्राच्या भविष्याला आकार देण्याचा सिडकोचा प्रयत्न आहे.

हा उपक्रम केवळ अरेना विकसित करण्यापुरता मर्यादित नसून सांस्कृतिक व आर्थिक चळवळीची ही सुरुवात आहे. या प्रकल्पाद्वारे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती, पर्यटनाला चालना, नवीन उद्योगांच्या संधींची निर्मिती होणार असून देशातील थेट करमणूक, जागतिक कार्यक्रम आणि आभासी अनुभव प्रदान करणारे अग्रणी शहर म्हणून नवी मुंबईचे देशामध्ये स्थान निर्माण होणार आहे.

या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया सुरू असून कल्पनांना मूर्त रूप देण्याकरिता सिडकोची असलेली कटिबद्धता अधोरेखित होत आहे व देशाची थेट करमणुकीची राजधानी म्हणून नवी म ुंबईचे स्थान बळकट होत आहे.




## पुतीन यांच्या कोंडीचे प्रयत्न

भारत दौऱ्यावरुन परतलेले रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन मायदेशी परतले आहेत. यानंतर आता पाश्चिमात्य देशांनी पुतीन यांच्या रशियाची कोंडी करण्याची योजना आखली आहे. जी-७ देश आणि युरोपियन युनियन रशियाच्या खनिज तेलाची वाहतूक रोखण्याच्या विचारात आहेत. यामुळे पाश्चिमात्य देशांची जहाजं आणि विमा कंपन्यांची कोंडी होईल. या कंपन्या आजही रशियाच्या खनिज तेलाच्या निर्यातीत मदत करत आहेत. जी-७ आणि युरोपियन युनियनमध्ये एकूण ३४ देश येतात.

रॉयटर्सनं सुत्रांच्या हवाल्यानं याबद्दलचं सविस्तर वृत्त दिलं आहे. जी-७ आणि युरोपियन युनियननं निर्बंध लादल्यास सध्याची दर मर्यादा यंत्रणा संपुष्टात येईल आणि रशियाला मोठा धक्का बसेल. कारण रशिया तेल वाहतुकीसाठी वापरले जाणारे बहुतांश टँकर पाश्चिमात्य देशांचे आहेत. यात ग्रीस, सायप्रस आणि माल्टा यांचा मोठा वाटा आहे. हे देश युरोपियन युनियनचा भाग आहेत.

रशियाकडून होणारी खनिज तेलाची निर्यात मोठी आहे. यातील एक तृतीयांश तेलाची वाहतूक पाश्चिमात्य देशांची जहाजं आणि सेवांच्या माध्यमातून केली जाते. या माध्यमातून होणारी बहुतांश तेल पुरवठा भारत आणि चीनला होतो. पाश्चिमात्य देशांनी तेलांचे टँकर्स न पुरवल्यास रशियाला मोठा धक्का बसू शकतो. अशा परिस्थितीत रशियाला त्यांच्या जुन्या तेल टँकर्सच्या ताफ्याचा वापर करावा लागेल. या ताफ्यात शेकडो टँकर्स आहेत. मात्र त्यांचं नेटवर्क तितकंसं मजबूत नाही. पुढच्या टप्प्यात या प्रकारचे निर्बंध लादण्याचा विचार युरोपियन युनियनकडून केला जात आहे. याची सुरुवात २०२६ च्या जानेवारीपासून केली जाऊ शकते. या प्रस्तावाला जी-७ देशांचा पाठिंबा मिळेल, अशी आशा युरोपियन युनियनला आहे. जी-७ च्या बैठकांमध्ये ब्रिटिश आणि अमेरिकन अधिकाऱ्यांमध्ये या विषयावर चर्चा झाली आहे. या सगळ्या संदर्भात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प काय भूमिका घेतात, याकडे लक्ष लागलं आहे. ट्रम्प प्रशासन या प्रकरणात कोणती रणनीती आखणार याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे. कारण रशिया-युक्रेन युद्धात ट्रम्प यांनी मध्यस्थीचा प्रयत्न केलेला आहे.

२०२२ पासून रशिया विरुद्ध युक्रेन असा संघर्ष सुरु आहे. दोन्ही देशांमध्ये सुरु असलेलं युद्ध थांबवण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. पण ते अपयशी ठरले आहेत. रशिया खनिज तेलाच्या व्यापारातून येत असलेला पैसा युद्धात वापरत असल्याचा दावा डोनाल्ड ट्रम्प वारंवार करत आहेत. त्यामुळेच रशियाकडून सुरु असलेला तेल व्यापार खंडित करण्यासाठी मोठी रणनीती आखली जात आहे.


## सहा जणांनी एकट्याला गाठत २१ वार करुन संपवलं !

**दि.०७, चंदननगर :** प्रेमसंबंधावरून भांडणं केल्यानं प्रियकराने आणि त्याच्या साथीदारांनी धारदार हत्यारांनी २९ वार करून प्रेयसीच्या मावसभावाची निर्घृण हत्या केल्याचं पोलीस तपासात निष्पन्न झालं आहे.

कोणताही पुरावा नसताना चंदननगर पोलिसांनी रात्रभर तपास करून तरुणाची हत्या करून फरारी झालेल्या मारेकऱ्यांच्या मुसक्या सहा तासांत आवळल्या, तर सहा अल्पवयीनांना ताब्यात घेतलं आहे.

लखन ऊर्फ सोन्या बाळू सकट (वय १८, रा. आंबेडकर वसाहत, चंदननगर) असं मृताचं नाव आहे. या प्रकरणी केशव बबन वाघमारे (वय ३२) यांनी फिर्याद दिली आहे. त्यावरून प्रथमेश शंकर दारकू (वय २०), यश रवींद्र गायकवाड (वय १९), जानकीराम परशुराम वाघमारे (वय १८), महादेव पांडुरंग गंगासागरे (वय १९), बालाजी आनंद (वय १९) आणि करण निवृत्ती सरवदे (वय १८, सर्व रा. बोराटे वस्ती, चंदननगर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

# भारत रशिया दृढ मैत्री



रशियाचे राष्ट्राध्यक्ष वाल्दिमिर पुतिन यांचा दोन दिवसांचा ऐतिहासिक भारत दौरा नुकताच पार पडला. पुतिन यांच्या या भारत दौऱ्याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते. युक्रेन रशिया युद्ध सुरू झाल्यानंतर आणि अमेरिका - भारत यांचे संबंध दुरावल्यानंतर पुतिन यांचा हा पहिलाच दौरा असल्याचे या दौऱ्याकडे अमेरिकेसह संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते.

पुतिन यांच्या या दौऱ्याकडे अमेरिकेचे विशेष लक्ष होते मागील काही महिन्यांपासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकेखोरपणामुळे भारत आणि अमेरिकेचे संबंध कमालीचे दुरावले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क (टेरीफ) लावल्यानंतर दोन्ही देशात कटुता निर्माण झाली. सुरुवातीला भारतावर २५ टक्के अतिरिक्त शुल्क (टेरीफ) लावणाऱ्या ट्रम्प यांनी भारताने रशियाशी तेल खरेदी करू नये. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने रशिया त्या पैशातून शस्त्र खरेदी करत आहे आणि त्यामुळेच रशिया युक्रेन युद्ध थांबत नाही.

भारत रशियाकडून तेल खरेदी करून एकप्रकारे रशिया युक्रेन युद्धाला उत्तेजन देत आहे असा जावई शोध लावतानाच ट्रम्प यांनी भारताने रशियाकडून तेल खरेदी केले तर अमेरिका भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावेल असा इशारा दिला होता अर्थात भारताने त्यांच्या इशाऱ्याकडे डोळेझाक केले त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावले. या अतिरिक्त शुल्कामुळे भारत घाबरून रशियाशी असलेला व्यवहार थांबवेल आणि रशियाकडून तेल खरेदी करण्याचे थांबवेल असे ट्रम्प यांना वाटले होते झाले मात्र उलटेच. भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे तर थांबवले नाहीच उलट रशियाशी असलेले जुने मैत्रीचे संबंध आणखी दृढ करण्याचा प्रयत्न केला त्याचाच परिपाक म्हणजे पुतिन यांचा भारत दौरा. पुतिन यांनी भारताचा दौरा करून दोन्ही देशातील मैत्रीचे संबंध दृढ असल्याचेच सिद्ध केले. या दौऱ्यात दोन्ही देशांदरम्यान महत्वाचे करार करण्यात आले.

पुतिन भारत दौऱ्यावर आता आले असले तरी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन हे फोनवरून सातत्याने एकमेकांशी संवाद साधून चर्चा करतच होते. ऑगस्ट महिन्यात भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर हे रशियाच्या दौऱ्यावर गेले होते. अमेरिकेशी आलेल्या कटुतेच्या पार्श्वभूमीवर ती भेट झाली होती. एस जयशंकर यांनी त्या भेटीत रशियाचे राष्ट्राध्यक्ष वाल्दिमिर पुतिन यांची भेट घेतली त्या भेटीत अनेक विषयावर चर्चा केली मात्र त्या भेटीचा मुख्य अजेंडा हा अमेरिकेची दादागिरी हाच होता. त्या बैठकीत भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी पुतिन यांच्यासमोर अमेरिकेच्या दुहेरी नीतीचा पर्दाफाश केला त्यामुळे अमेरिकेला योग्य तो संदेश दिला गेला होता.

अमेरिकेची दुहेरी नीती म्हणजे ज्या अमेरिकेने भारत रशियाकडून तेल खरेदी करतो म्हणून भारतावर ५० टक्के शुल्क लावले त्याच अमेरिकेने चीनवर मात्र अतिरिक्त शुल्क लावण्यास ९० दिवसांची स्थगिती दिली. विशेष म्हणजे चीन रशियाकडून भारतापेक्षा अधिक प्रमाणात तेल खरेदी करतो. भारताला दम देऊन अतिरिक्त शुल्क वसूल करणारा अमेरिका मात्र चीन समोर फुसका बार ठरतो हेच यातून सिद्ध होते. अमेरिकेने भारतावर अतिरिक्त शुल्क लावल्याने दोन्ही देशांच्या संबंधात कटुता निर्माण झाली असल्याने अनेकांनी चिंता व्यक्त केली असली तरी म्हणतात ना वाईटातूनही चांगले घडते तसेच इथेही घडत आहे.

अमेरिका आणि भारताचे संबंध बिघडले असताना भारत आणि रशियाचे संबंध मात्र पूर्वीप्रमाणे दृढ होत आहे. रशिया हा तसा भारताचा सर्वात विश्वासू आणि सर्वात जुना मित्र. पंडित नेहरूंपासून सुरू झालेली ही मैत्री आजही कायम आहे. ज्या ज्या वेळी भारतावर संकट आले त्या त्या वेळी रशियाने आपली मैत्री निभावली हे मान्यच करावे लागेल. १९६५ आणि १९७१ साली झालेल्या भारत पाकिस्तान युद्धात रशिया भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला या उलट अमेरिकेने प्रत्येक वेळी पाकिस्तानची तळी उचलली. आताच्या ऑपरेशन सिंदूरमधील अमेरिकेची भूमिकाही पाक धार्जिणीच होती हे संपूर्ण जगाने पाहिले आहे.

मधल्या काळात भारत आणि रशियाचे संबंध पूर्वीप्रमाणे दृढ राहिले नव्हते. विशेषतः ट्रम्प पहिल्यांदा सत्तेत आल्यापासून भारत अमेरिकेकडे झुकू लागला असे रशियाला वाटत होते अर्थात त्याला नमस्ते ट्रम्प, हाव दि मोदी हे कार्यक्रमही कारणीभूत होते शिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी ट्रम्प यांचा माय डिअर फ्रेंड डोनाल्ड असा जाहीर उल्लेख करत असल्याने तसा रशियाचा समज झाला आणि ते स्वाभाविकच आहे. त्यामुळेच रशिया चीनकडे झुकली होती आता ट्रम्प यांच्या या कृतीने पुन्हा दोन्ही मित्र पुन्हा एकत्र आले आहेत. रशिया ही महासत्ता आहे आणि भारत होऊ घातलेली महासत्ता आहे. या दोन्ही महासत्ता पुन्हा एकत्र आल्या तर त्याचा जागतिक पटलावर मोठा परिणाम होणार आहे. त्याचा सर्वाधिक फटका अर्थात अमेरिकेलाच होणार आहे असे जाणकार सांगतात. अमेरिकेच्या संयुक्त राष्ट्रातील माजी राजदूत निकी हॅले यांनी याच मुद्द्यावर बोट ठेवत ट्रम्प यांच्यावर टीका केली होती. त्यांनी म्हटले होते की ट्रम्प यांच्या या कृतीमुळे अत्यंत महत्वाच्या काळात भारत अमेरिका संबंध तणावपूर्ण बनले आहे. ट्रम्प चीनसारख्या प्रतिस्पर्ध्यांशी सौम्य भूमिका घेताना भारतासारख्या सौहार्दपूर्ण संबंध असलेल्या देशाशी संबंध बिघडवत आहे. ट्रम्प यांच्या धोरणामुळे भारत, रशिया आणि चीन यांच्यातील परस्पर संबंध बळकट होईल त्याचा फटका अखेर अमेरिकेलाच बसेल. निकी हॅले यांना जे समजते ते ट्रम्प यांना का समजत नाही हा प्रश्न आहे.

पण काहीही असो ट्रम्प यांच्या हेकोखोरपणामुळे भारत रशिया मैत्री संबंधाचा नवा अध्याय लिहिला जात आहे. पुतिन यांच्या भारत दौऱ्यानंतर भारत रशिया या दोन जुन्या मित्रांमधील मैत्रीचे संबंध दृढ झाले आहेत हे मात्र नक्की.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**


# बोधी दिन : मानवजागृती आणि सामाजिक परिवर्तनाचा मार्ग

जगाच्या इतिहासात काही दिवस फक्त प्रसंग म्हणून नाही तर बदलांचे बिंदू म्हणून ओळखले जातात. अशा दिवसांपैकी एक म्हणजे ८ डिसेंबर बोधी दिन होय. हा दिवस केवळ बौद्ध धर्मीयांसाठी अध्यात्मिक महत्त्वाचा नाही, तर संपूर्ण मानवजातीसाठी विचार, विवेक, करुणा आणि सामाजिक न्यायाची स्मृती जागवणारा दिवस आहे. कारण याच दिवशी राजकुमार सिद्धार्थांनी बोधी वृक्षाखाली ध्यानधारणा करत करत जीवनातील अनंत दुःख, विषमता, युद्ध, सत्ता, लोभ व अन्यायाच्या संकटांचे मूळ शोधत अखेर ज्ञानप्राप्ती केली आणि ते गौतम बुद्ध झाले. म्हणूनच बोधी दिन ही केवळ धार्मिक घटना नाही, तर मानवजातीच्या सामाजिक, नैतिक, तत्त्वज्ञानिक आणि मानवतावादी प्रवासातील एक अविस्मरणीय मैलाचा दगड आहे.

मानव समाजाच्या उत्क्रांतीत अनेकदा युद्धांनी, एकाधिकारशाहीने, साम्राज्यवादाने आणि सामाजिक जात-धर्म-वंशभेदांनी दहशत निर्माण केली. आपल्याला प्रश्न असा पडतो की मानवाला मानव बनविणारा मार्ग कोणता? शक्तीचा की प्रज्ञेचा? तर बुद्धांचे उत्तर होते की शांततेचा, नैतिकतेचा, करुणेचा, समानतेचा आणि मध्यममार्गाचा. म्हणूनच समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता बोधी दिन हा केवळ आध्यात्मिक ज्ञानाचा उत्सव नाही तर मानवी समाजाला न्याय्य, समतामूलक आणि नैतिक दिशेने प्रवास करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे.

इतिहासात पाहिल्यास, ज्ञानप्राप्तीपूर्वीचा सिद्धार्थ हा केवळ एखाद्या राज्यातील राजकुमार नव्हता; तो एक संवेदनशील निरीक्षक होता. मृत्यू, रोग, वृध्दत्व आणि दारिद्र्य या चार सत्यांनी त्याला हादरवले. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून हे प्रश्न आजही तेवढेच जिवंत आहेत. जग प्रगत झाले असे म्हणवले जाते, पण भूक, युद्ध, सामाजिक असमानता, मानसिक तणाव, जातीय संघर्ष, धार्मिक कट्टरता आणि उपभोगवाद-नफा-आधारित जीवनपद्धतीने मानवाला पुन्हा असहाय्य बनवले आहे. अशा काळात बोधी दिनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

गौतम बुद्धांच्या शिकवणीत धम्म हा कर्तव्य,



नैतिकता आणि विवेक होता. त्यामुळे धम्म म्हणजे कर्मकांड, जप-तप, पुरोहिती किंवा अंधश्रद्धा नव्हे, तर समाजाला समता आणि न्याय मिळवून देणारी प्रेरणा. म्हणूनच बुद्ध म्हणतात की अप्प दीपो भव म्हणजेच स्वतःचा दीप स्वतः बना. समाजशास्त्रीय अर्थ असा की, प्रत्येक व्यक्तीने आत्मबोध, विचारमंथन आणि नैतिक धैर्य विकसित केले पाहिजे; कारण परिवर्तन हे बाहेरून लादले जाणारे नसते तर ते अंतर्मनातून जन्मते.

बोधी दिन मानव स्वभावातील तीन प्रमुख प्रवृत्तींकडे निर्देश करतो, त्यामध्ये पहिली प्रवृत्ती म्हणजे लोभ म्हणजेच अत्यंत मिळवण्याची इच्छा होय. आधुनिक समाजशास्त्र सांगते की बाजारव्यवस्था भौतिक समाधान देऊ शकते, पण ती आध्यात्मिक आणि भावनिक शांती देऊ शकत नाही. दुसरी प्रवृत्ती आहे द्वेष होय. आजही आपण पाहतो की राजकारणात, धर्मांमध्ये, समाजवर्गांमध्ये, डिजिटल माध्यमात आणि राष्ट्रांमध्ये लोकांमध्ये मतभेदांपेक्षा तिरस्कार वाढत आहे. बुद्ध म्हणतात की द्वेषाने द्वेष संपत नाही; प्रेमानेच तो संपतो. तिसरी प्रवृत्ती म्हणजे अज्ञान होय. दडपशाही, भेदभाव, हिंसा आणि कट्टरतेचा मूलाधार. समाजातील अन्याय, जातीय दमन, पितृसत्ता, वर्ण-जातिवाद, आर्थिक शोषण, पर्यावरणाचा विनाश यांची मुळे मानवी अज्ञानात आणि अविचारी कृतीत आहेत. बोधी म्हणजे हे अज्ञान दूर करण्याची प्रक्रिया होय.

म्हणूनच बोधी दिन मानवाला स्मरण करून देतो की ज्ञान म्हणजे माहिती नव्हे, तर जागृती. आज इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता, जागतिकीकरण आणि डिजिटल संपर्कामुळे माहितीचे जग फुलले आहे; पण शांती, श्रद्धा, मानवता आणि संयम कोठेतरी हरवले आहेत. म्हणूनच बुद्धांचे तत्त्वज्ञान समाजशास्त्रीय प्रश्न विचारते की आपण अधिक प्रगत झालो आहोत, की फक्त अधिक गुंतागुंतीचे आणि अस्थिर झालोआहोत?

बोधी दिन आपल्याला न्यायाच्या, समतेच्या, संवादाच्या आणि अहिंसेच्या नव्या मूल्यांना स्वीकारण्याचे आह्वान देतो. बुद्धांनी लोकशाहीचा पाया मांडताना संघ, विचारस्वातंत्र्य, मतभेदांचा सन्मान आणि सार्वत्रिक करुणा या तत्त्वांना केंद्रस्थानी ठेवले. आजच्या लोकशाही व्यवस्थेत या मूल्यांची पुन्हा गरज भासते. कारण विचारविनिमयाऐवजी संघर्ष, सहिष्णुतेऐवजी कट्टरता आणि मानवी हक्कांऐवजी नियंत्रणवाद वाढताना दिसतो आहे. म्हणूनच बोधी दिन आपल्याला सांगतो की समाजाची उभारणी वर्चस्वावर नाही, तर सहजीवनावर होते.

याच संदर्भात बुद्धांनी समाजातील सर्वात उपेक्षित घटक म्हणजेच महिला, शूद्र, वंचित, संघर्षग्रस्त आणि पीडित घटकांमध्ये मानवी समानतेचे तत्त्व पहिल्यांदा प्रत्यक्षात आणले. समाजातील प्रत्येक जण जात, लिंग, वर्ग, धर्म, व्यवसाय किंवा जन्माच्या आधारे समान आहे हे तत्त्व सामाजिक न्यायासाठी आजही महत्त्वाचे आहे. बोधी दिन हा वर्तमानातील मानसिक आरोग्याच्या संकटांनाही उत्तर देतो. आधुनिक जीवनशैली वेगवान, स्पर्धात्मक, तणावग्रस्त आणि यांत्रिक झाली आहे. बुद्धांचे ध्यान, सम्यक स्मृती, मन:शांतता आणि प्रज्ञेचे तत्त्व आज जागतिक मानसिक आरोग्य चळवळीचे आधार आहे. जागरूकता, ध्यान, भावनिक बुद्धिमत्ता (mindfulness, meditation, emotional intelligence) यांचा उगम हा बोधीच्या तत्त्वज्ञानातच आहे.

बोधी दिन आपल्याला पर्यावरणीय जाणीव देखील शिकवतो. बुद्धांनी निसर्गासोबत संघर्ष नव्हे, तर सह-अस्तित्व सुचवले. आज पृथ्वीला हवामान बदल, प्रदूषण, जैवविविधतेचा ऱ्हास, नद्यांचा मृत्यू, जंगलांचा विनाश आणि प्राणी-मानव संघर्ष या समस्या भेडसावत आहेत. अशावेळी सर्व प्राणी माझेच आहेत हा बुद्धांचा संदेश आजच्या पर्यावरणीय नैतिकतेचा मूळ पाया ठरतो. याच अर्थाने बोधी दिन हा केवळ स्मरणदिन नाही तर तो सततच्या आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. बुद्धांनी सांगितले की मनुष्याचे दुःख भाग्याने नव्हे, तर त्याच्या विचारांनी आणि कृतींनी निर्माण होते. म्हणून बदल हवा असेल तर तो आतून सुरू झाला पाहिजे.

आजच्या काळात बोधी दिनाचा संदेश जगभराला एका नव्या सामाजिक कराराची गरज सांगतो तो संदेश म्हणजे, जिथे धर्म हिंसा नव्हे, संवाद निर्माण करतो. जिथे तंत्रज्ञान मानवतेची परिपूर्ती करतो. जिथे समीक्षाशील विचार आणि करुणा एकत्र येतात. जिथे समाज फक्त विकसित नसतो, तर मनानेही सभ्य असतो. या अर्थाने बोधी ही स्वतःमध्ये एक अंतरिक क्रांती आहे. ती जीवनाच्या संघर्षांना टाळणारी नाही, तर त्या संघर्षांचे स्वरूप समजून शांततेने त्यावर उत्तर शोधणारी आहे. बोधी दिन ही एक जाणीव आहे की जग बदलण्यासाठी पहिले पाऊल म्हणजे स्वतःला बदलणे होय.

आज ८ डिसेंबरच्या या दिवशी आपण सर्वांनी स्वतःला विचारावे की आपण जागृत आहोत की फक्त जागे आहोत?

कारण बुद्धांच्या मते, मनुष्य जन्माला येतो, पण मानव बनण्यासाठी त्याला विवेक, करुणा, दया आणि समता अंगीकारावी लागते. बोधी दिन आपल्याला एकच संदेश देतो की, शांती ही बाह्य मिळकत नाही; ती अंतर्मनातून उगम पावलेली प्रज्ञा आहे. आणि हीच प्रज्ञा समाजाला न्याय्य, समतामूलक, शोषणमुक्त आणि सौहार्दपूर्ण बनवू शकते. म्हणून आजच्या या पवित्र दिवशी आपण फक्त स्मरण नव्हे तर अनुकरण करण्याचा संकल्प करूया. कारण जेव्हा प्रत्येक मानव बोधी होईल, तेव्हा जगात खऱ्या अर्थाने सुंदरता, शांती आणि मानवता नांदेल.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्र, पाली आणि बुद्धीझमचे अभ्यासक आहेत)**
**मो. ९९६०१०३५८२**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## वासिंद येथे दिव्यांग महोत्सव व गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न



**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.०७, शहापूर (ठाणे) :** दिव्यांग भरारी फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित दिव्यांग महोत्सव व गुणगौरव सोहळा दि.०७ डिसेंबर, २०२५ रोजी फॉरेस्ट ऑफिस, स्टेशन रोड, वासिंद येथे मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमास उपस्थित मान्यवर, पाहुणे तसेच दिव्यांग बांधवांचे मनापासून स्वागत करण्यात आले. महोत्सवात दिव्यांग विद्यार्थी, शालेय विद्यार्थी आणि विवाहित दिव्यांग दांपत्य यांचा विशेष सन्मान करण्यात आला. दिव्यांग व निराधार बहिणींना भावपूर्ण भाऊबीज मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. तसेच दिव्यांग कायदा, त्याची अंमलबजावणी आणि दिव्यांगांना मिळणाऱ्या विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शनही करण्यात आले. कार्यक्रमात दिव्यांग बांधवांना आकर्षक भेटवस्तूंचे वितरण तसेच सर्वांसाठी लकी ड्रॉ सोडत घेण्यात आली. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन संस्थापक अध्यक्ष राणू वेहळे, उपाध्यक्ष जगन्नाथ जाधव व त्यांच्या संपूर्ण टीमच्या पुढाकाराने पार पडले. या सोहळ्यास प्रहार जनशक्ती पक्ष शहापूर तालुका अध्यक्ष वसंत पानसरे, सल्लागार रामचंद्र मडके, सल्लागार घनशाम परदेशी, संघटक विजय हरणे, युवा संघटक मयूर किरपण, पोलीस निरीक्षक वासिंद सचिन हिंदुळेकर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

## 'पैंजण' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन संपन्न



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०७, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील हमरापुर भागातील तांबडशेत येथील कवी व लेखक रमेश नारायण पाटील लिखित पैंजण या तिसऱ्या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा साई मंदिर तलाव कवी कट्टा, पेण येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी निवृत्त शिक्षक एस.एस.पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून दादर गावचे सुपुत्र प्रदीप पाटील हे होते. कवी रामनाथ पाटील यांच्या श्री गणेशाच्या प्रार्थनेने पुस्तक प्रकाश सोहळ्याला प्रारंभ झाला. कार्यक्रमाला उपस्थित असणारे मान्यवर प्रदीप पाटील, एस.एस. पाटील सर, म.वा. म्हात्रे, कवी दिनानाथ पाटील व के.पी. पाटील सर यांच्या शुभहस्ते पैंजण या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. लेखक रमेश पाटील यांनी काव्यसंग्रहाविषयी आपले मनोगत हितगुज प्रेक्षकांसमोर समोर सादर केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रकाश ठाकूर यांनी केले.

## सुरेश खोसे यांना आदर्श संपादक पुरस्कार जाहीर



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) :** जिल्ह्यातील विविध वर्तमानपत्रांसाठी १९९२ पासून काम करणारे व १९९७ पासून दैनिक पारनेर समर्थ या वर्तमानपत्राचे निर्भिड संपादक शिवश्री सुरेश काशिनाथ खोसे पाटील यांना मराठा सेवा संघ प्रणित बीड जिल्ह्यातील आष्टी येथील तानुबाई बिरजे पत्रकार परिषदेचा पत्रकारिता क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठेचा जिजाऊ माँ साहेब आदर्श संपादक पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आल्याची माहिती शिवश्री ज्येष्ठ पत्रकार ऍड. सिताराम पोकळे यांनी दिली असून लवकरच या पुरस्काराचे वितरण होणार आहे. पत्रकार व संपादक सुरेश खोसे पाटील हे गेली ३२ वर्षांपासून तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात पत्रकारिता करीत आहेत. सर्वसामान्यांच्या प्रश्नावर ते सतत निष्पक्षपाती वाचा फोडतात. त्यांनी निर्भिडपणे सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवले आहेत. सुरेश खोसे पाटील हे संपादक असलेले दैनिक पारनेर समर्थ हे दैनिक फक्त पारनेर तालुक्या पुरते मर्यादित न राहता अहिल्यानगर जिल्हा व राज्यात ही नावलौकिकास पात्र ठरले आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेत पत्रकारांसाठी कार्य करत असलेला देशातील सर्वात मोठ्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने त्यांना प्रथम पारनेर तालुका उपाध्यक्ष, नंतर अहिल्यानगर जिल्हा सचिव पदावर काम करण्याचा करण्याची संधी देत , आता राज्य कार्यकारिणी वर सदस्य पदावर काम करण्याचा बहुमान दिला आहे. बीड येथे राज्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. सुरेश खोसे पाटील यांच्या या बहुमानाबद्दल ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे,पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खा.निलेश लंके , माजी खा.डॉ. सुजय विखे पाटील , जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनी ताई विखे पाटील, आ.काशिनाथ दाते, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक संजय भोकरे, प्रदेशाध्यक्ष गोविंदराव वाकडे, प्रदेश सचिव डॉ.विश्वासराव आरोटे तसेच सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे.

## शींव आयुर्वेद महाविद्यालयातर्फे चैत्यभूमीवर वैद्यकीय शिबिर संपन्न



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०६, मुंबई :** महापरिनिर्वाण दिना निमित्त शींव आयुर्वेद महाविद्यालयाने ५-६ डिसेंबरला चैत्यभूमीवर मोफत वैद्यकीय शिबीर आयोजित केले होते. या शिबीरात अनेक आजी व माजी डॉक्टरांनी सेवा व भेट देवून शिबीर संपन्न केले. या शिबीराच्या सेवेचा अनेक आंबेडकरी अनुयायांनी लाभ घेतला. डॉ.सुर्यभान डोंगरे, डॉ.गणेश पुराडकर, डॉ.विजय पटाईत यांनी शिबीराचे अतिशय उत्तम आयोजन व नियोजन केले होते. या शिबीरात तज्ञ डॉक्टर प्राध्यापक, पदव्युत्तर विद्यार्थी, आंतरवासीय विद्यार्थी तसेच पदवीचे विद्यार्थी यांनी आपली सेवा दिली या शिबीरात सर्व प्रकारच्या रुग्णांवर औषधोपचार करण्यात आले. आयुर्वेद हृदयरोग तज्ञ डॉ.अशोक लोंढे यांनी दोन्ही दिवस शिबिरात सेवा दिली. स्त्री रोगतज्ञ डॉ.वर्षा गायकवाड-आनंद, बालरोगतज्ञ डॉ.सोनिया सावंत व डॉ..सुभाष घोलप यांनी शिबीरास प्रोत्साहन दिले. तसेच अनेक डॉक्टरांनी या शिबिरात आपली सेवा दिली. डॉ.सुर्यभान डोंगरे, डॉ.गणेश पुराडकर, डॉ.विजय पटाईत, डॉ..संजय पाईकराव, डॉ.अरूण दुधमल, डॉ.स्नेहल सुर्यवंशी, डॉ.प्रितम दवे, डॉ.मुक्ता सदविकर, डॉ. प्रियंका कांबळे, डॉ.विजय पोटकुले, व डॉ.अर्चना महाजन, डॉ.शार्दुल चव्हाण, डॉ.पुजा तांबे, डॉ.निकीत राठोड तसेच द्वितीय वर्षातील विद्यार्थी श्रेया अनभुले, कामिका कदम, हिर बोराणा आणि आफताब हुसैन यांनी या वैद्यकीय शिबीरात सहभाग घेतला.

# रेल्वे प्रवासी सेवा संस्थेच्या आंदोलनाला आ. किशोर जोरगेवार यांची भेट

## हिवाळी अधिवेशनात मांडणार प्रश्न




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** चंद्रपूर शहरातील रेल्वे संबंधित दीर्घकालीन प्रलंबित प्रश्नांची दखल घेण्यासाठी रेल्वे प्रवासी सेवा संस्थेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या उपोषण आंदोलनाला आज आ. किशोर जोरगेवार यांनी रविवार, दिनांक ०७ डिसेंबर २०२५ रोजी भेट दिली.

यावेळी सदर प्रश्न नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात उपस्थित करणार असल्याचे सांगत त्यांनी आंदोलकांचे निवेदन स्वीकारले. यावेळी यावेळी भारतीय जनता पार्टी महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, भारतीय जनता पार्टीच्या महिला आघाडी महानगर अध्यक्ष छबु वैरागडे, विधानसभा अध्यक्ष दशरथसिंह ठाकुर, महामंत्री सविता दंढारे, देवानंद वाढई आदींची उपस्थिती होती.

चंद्रपूर-मुंबई सुपरफास्ट ट्रेन तसेच चंद्रपूर-पुणे फास्ट ट्रेन रोज भुसावळ मार्गे सुरू करण्याच्या प्रमुख मागण्यांसह रेल्वे संबंधित इतर मागण्यांना घेऊन रेल्वे प्रवासी सेवा संस्थेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ६ डिसेंबरपासून आंदोलन सुरू करण्यात आले आहे. आज रविवारी आ. जोरगेवार उपोषणस्थळी पोहोचले आणि उपोषणकर्त्यांशी संवाद साधला. आंदोलन कर्त्यांकडून त्यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले. निवेदन स्वीकारताना त्यांनी या मागण्यांवर सकारात्मक विचार केला जात असल्याचे सांगितले.

रेल्वेसंबंधी प्रश्न सोडवण्यासाठी आवश्यक त्या सर्व स्तरांवर पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. आ. जोरगेवार म्हणाले, चंद्रपूर जिल्ह्याला रेल्वेच्या उत्तम आणि वेगवान सेवांची गरज आहे. या मागण्या न्याय्य असून, जनहिताच्या आहेत. या विषयावर हिवाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करणार असून संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चाही करणार आहे. जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी मी सदैव कटिबद्ध आहे, असे ते यावेळी म्हणाले.

# स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉन २०२५' यशस्वी

## आयुक्तांसह ७ हजार हून अधिक नागरिकांचा सहभाग




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०७, नवी मुंबई :** स्वच्छ आणि सुंदर नवी मुंबईचा जागर करीत ७ हजाराहून अधिक नागरिकांनी उत्साहाने सहभागी होत पामबीच मार्गावर आयोजित 'स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉन २०२५' हा उपक्रम यशस्वी केला. सकाळी ठीक ४.३० वा सुरू झालेल्या हाफ मॅरेथॉनमधील सर्वाधिक ३२ किमी. अंतराच्या मुख्य गटात नवी मुंबई महानगर पालिकेचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी स्वत: धावपटू म्हणून सहभागी होत नागरिकांसमवेत स्वच्छतेचा संदेश प्रसारित करीत ही हाफ मॅरेथॉन यशस्वीपणे पूर्ण केली.५, १०, २१ आणि ३२ किमी अंतराच्या वेगवेगळ्या गटांमध्ये लेट्स सेलिब्रेट फिटनेस यांच्या माध्यमातून नवी मुंबई महानगर पालिकेच्या सहयोगाने श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी शताब्दीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉनमध्ये विविध वयोगटातील स्त्री-पुरुष उत्साहाने सहभागी झाले होते.

यामध्ये युवकांची संख्या लक्षणीय होती.सकाळी ४.३० वा. या हाफ मॅरेथॉन मधील ३२ किलोमीटर अंतराच्या गटाला सुरूवात होऊनही इतक्या पहाटे मोठ्या संख्येने आणि उत्साहाने धावपटू उपस्थित होते. नागरिकांनी उत्साही व उत्स्फूर्तपणे सहभागी होत स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉन् उपक्रम यशस्वी केल्याबद्दल नागरिकांचे आभार व्यक्त करीत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी दिव्यांगांनीही सहभागी होत प्रेरणादायी उपस्थिती दर्शविली याचा विशेष उल्लेख केला.स्वच्छ व पर्यावरणशील शहर ही नवी मुंबईची ओळख असून आरोग्यपूर्ण शहराचे ध्येय नजरेसमोर ठेवून आयोजित केलेल्या हाफ मॅरेथॉन उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी झाल्याबद्दल नागरिकांचे तसेच हाफ मॅरेथॉन आयोजनात सहयोग देणाऱ्या लेट्स सेलिब्रेट फिटनेस आणि नवी मुंबई गुरुद्वारा सुप्रीम कौन्सिल व गुरुद्वारा श्री दशमेश दरबार आणि इतर सहयोगी संस्थांचे आयुक्तांनी आभार म ानले.याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, प्रशासन विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत जवादे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ अजय गडदे, परिमंडळ १ चे उपायुक्त सोमनाथ पोटरे, परिमंडळ २ चे उपायुक्त संजय शिंदे, मालमत्ता कर विभागाचे उपायुक्त डॉ अमोल पालवे, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपायुक्त अभिलाषा म्हात्रे - पाटील, कार्यकारी अभियंता प्रवीण गाडे व राजेश पवार, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, बेलापूरचे विभाग अधिकारी प्रशांत नेरकर, उपअभियंता गजानन पुरी, उप स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे आणि इतर अधिकारी उपस्थित होते. माजी खासदार संजीव नाईक यांनीही याप्रसंगी आवर्जून उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. लेट्स सेलिब्रेट फिटनेस संस्थेच्या प्रमुख रिचा समित व नवी मुंबई गुरुद्वारा सुप्रीम कौन्सिलचे पदाधिकारी व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

# आ.जोरगेवारांच्या उपस्थितीत युवक काँग्रेस विधानसभा महासचिव रघाताटे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. ०७ चंद्रपूर :** युवक काँग्रेस विधानसभा महासचिव वैभव रघाताटे यांनी आ. किशोर जोरगेवार यांच्या उपस्थितीत प्रकाश देवतळे यांच्या नेतृत्वात असंख्य कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

हा कार्यक्रम रविवार, दिनांक ०७ डिसेंबर २०२५ रोजी आमदार किशोर जोरगेवार यांच्या गजानन निवासस्थानी उत्साहात पार पडला.

यावेळी भारतीय जनता पार्टी म हानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, भारतीय जनता पार्टीच्या महिला आघाडी महानगर अध्यक्ष छबु वैरागडे, विधानसभा अध्यक्ष दशरथ सिंह ठाकुर, महामंत्री सविता दंढारे, ॲड. राहुल घोटेकर, देवानंद वाढई आदींची उपस्थिती होती. यावेळी आ. किशोर जोरगेवार म्हणाले की, आजचा दिवस केवळ पक्ष प्रवेशाचा नाही, हा विश्वासाचा दिवस आहे. वैभव रघाताटे यांच्यासारख्या तरुण नेतृत्वाचा आपल्या कुटुंबात प्रवेश हा आपल्या संघटनेला नवी ऊर्जा देणारा आहे. राजकारण म्हणजे पदाचा अभिमान नव्हे, तर जबाबदारी आहे. जनता आपल्या पासून अपेक्षा ठेवते. या अपेक्षा पूर्ण करण्याची ताकद कार्यकर्त्यांत आहे. प्रत्येक कार्यकर्ता हा या पक्षाचा आधारस्तंभ आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील प्रत्येक भागात आपण काम केले आहे. अभ्यासिकांचा उभार, रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य सेवा यासह प्रत्येक ठिकाणी आपण योजनाबद्ध काम केले आहे. लोकांच्या जीवनमानात बदल दिसायला लागला आहे. पक्षात येणाऱ्याचे आपण कौतुक करतो, जपतो आणि योग्य संधी देतो. पक्ष प्रवेश म्हणजे शेवट नाही, तर ती सुरुवात आहे, असे ते यावेळी म्हणाले. यावेळी रघाताटे यांच्यासह आलेल्या सर्व कार्यकर्त्यांच्या गळ्यात भारतीय जनता पक्षाचा दुपट्टा घालून आ. किशोर जोरगेवार यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले.

वैभव रघाताटे यांनी पक्ष प्रवेशानंतर सांगितले की, आ.८ किशोर जोरगेवार यांच्या विकासकाम ांनी प्रभावित होऊन आम्ही भाजपात आलो आहोत. चंद्रपूरात विकासाची नवी दिशा सुरू झाली आहे. आम्ही या प्रवासात सक्रिय सहभाग करणार, असे ते यावेळी म्हणाले.

# मुदखेड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०६, मुदखेड (नांदेड) :** भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरांत विविध सामाजिक, सर्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत महापरिनिर्वाण दिन श्रद्धाभावाने साजरा करण्यात आला. शहरातील उपासक उपासिका, विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते तसेच पत्रकार संघ यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या ठिकाणी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी नागोराव लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितांनी सामूहिक त्रिशरण व पंचशीलाचे पठन केले. कार्यक्रमाल माजी नगराध्यक्ष राजबहादुर कोत्तावार, माजी उपनगराध्यक्ष माधव कदम,माजी नगरसेवक संजय आऊलवार, गोविंद गोपनपल्ले, रावसाहेब चौदंते, कैलास चंद्रे, गंगाधर डांगे, कैलास गोडसे ,नितीन चौदंते,सूर्यकांतराव चौदंते, अंकुश उर्फ भैया मामीडवार, मनोज कुमार कांबळे, मुजीब पठाण, अविनाश चौदंते,राजू चौदंते, शिवानंद देवके, मधुकर दवणे, प्रकाश चौदंते, संजय उर्फ पप्पू सोनटक्के, शेख बबलू जानिमियां, संजय गिरी होमगार्ड भंडारे चिकाळेकर, गंगाधर कुंचटवाड, छायाचित्रकार ताटे ,यांच्या सह अन्य कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. पत्रकार संघाच्यावतीने ही महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पत्रकार संघाचे जिल्हा संघटक संजय कोलते, प्रतापराव देशम ुख बारडकर, दिनेश शर्मा, रुखमाजी शिंदे, अतिक अहेमद धम्मदाता कांबळे, शेख जब्बार, शेख शम शुद्दीन, प्रल्हाद मस्के, साहेबराव हौसरे, साहेबराव गागलवाड, हाफिज कुरेशी, मोहम्मद हकीम, आदींची उपस्थिती होती. दरम्यान, पोलीस निरीक्षक बी. आर. कांबळे यांनीही महामानवाच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले. सर्व स्तरांतील नागरिक, सामाजिक संघटना आणि कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त उपस्थिती होती.

अक्षराज



# आ.मुनगंटीवार यांच्या हस्ते चिंतलधाबा येथे ६१.१९ लाखांच्या प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे भूमिपूजन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, पोंभूर्णा (चंद्रपूर) :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे चिंतलधाबा गावाने सर्वांगीण विकासाच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. गावाच्या आरोग्यसेवा बळकटीकरणाच्या दृष्टीने नुकतेच चिंतलधाबा येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. तसेच कार्पेट निर्मिती व प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटनही आ. मुनगंटीवार यांनी केले असून, या उपक्रमामुळे स्थानिक महिलांसाठी रोजगाराची नवी दालने खुली झाली आहेत. यावेळी, प्रदेश महामंत्री अल्का आत्राम, भाजपा तालुकाध्यक्ष हरीष ढवस, सरपंच शुभांगी कुत्तरमारे, उपसरपंच रोशन ठेंगणे, विनोद देशमुख माजी सभापती पं.स. पोंभूर्णा, राहुल पाल, रवि मरपल्लीवार, अजय मस्के, माविमचे जिल्हा समन्वयक प्रदीप काथोडे, दशरथ फरकडे आदींची उपस्थिती होती.

आरोग्य उपकेंद्रासाठी तब्बल ६१.१९ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या प्राथमिक आरोग्य उपकेंद्रामुळे गावातील नागरिकांना आवश्यक आरोग्यसेवा आपल्या परिसरातच मिळणार आहेत. गावाच्या प्रगतीसाठी सतत



प्रयत्नशील असलेल्या सरपंच व उपसरपंच यांच्या मागण्यांना आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे ठोस बळ मिळाले आहे. चिंतलधाबाच्या विकासासाठी त्यांच्या या प्रयत्नांना आता वेग आणि दिशा मिळत असून गाव सर्वांगीण प्रगतीकडे वाटचाल करत आहे. नागरिकांनी मांडलेल्या दोन प्रमुख मागण्यांचाही विचार करण्यात आला. यामध्ये स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णयही तत्काळ घेण्यात आला आहे. बांधकाम विभागाला अंदाजपत्रक तयार करण्याचे आ.सुधीर मुनगंटीवार यांनी निर्देश दिले. चिंतलधाबाची विजेची समस्या सोडविण्यासाठी महावितरणसोबत सविस्तर बैठक घेण्यात येणार आहे. यापूर्वी उथळपेठ हे गाव १०० टक्के सोलार करण्यात आले होते; त्याच धर्तीवर चिंतलधाबा हे महाराष्ट्रातील दुसरे पूर्ण सौरऊर्जेवर चालणारे गाव करण्याचा मानस आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. त्यादृष्टीने आगामी वर्षभरात या सोलर प्रकल्पाबद्दल गतीने काम करण्याचे निर्देशही देण्यात आले. आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या निर्देशांमुळे चिंतलधाबा गावाच्या विकासाला नवे बळ मिळणार असून आरोग्य, ऊर्जा आणि मूलभूत सुविधांच्या उन्नतीला निर्णायक दिशा मिळेल.

***कार्पेट निर्मिती व प्रशिक्षण केंद्र***

चिंतलधाबा येथे महिला आर्थिक विकास महामंडळ आणि लोकर संशोधन संघ, मुंबई यांच्या संयुक्त उपक्रमातून स्वयं सहायता महिला बचत गटाच्या कार्पेट निर्मिती व प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आले. कार्पेट निर्मितीचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर येथील तरुणी व महिला यांच्या प्रशिक्षण कौशल्याचा भविष्यात विचार व्हावा, त्यांना स्थिर उत्पन्न मिळावे यासाठी येत्या सहा महिन्यात त्यांना मानधन देण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. यासाठी प्रशिक्षणार्थी तरुणी व महिलांची यादी तयार करावी.

# नवीन बिना येथे महापरीनिर्वाण दिनी निळया पाखरांच महामानवाला अभिवादन

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०६, नागपूर :** भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघ शाखा – नवीन बिना–भानेगांव यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन बिना बौद्ध विहारात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरीनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित केला होता.

कार्यक्रमाची सुरवात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या छायाचित्राला भैयाजी सोनटक्के, कलावती पाटिल, मिना मेश्राम, सुरेश गजभिये व कोषाध्यक्ष रविन्द्र ढोके यांच्याहस्ते माल्यार्पण करुन व अर्धध्वजारोहण (निळा झेंडा) घेवून करण्यात आली. भारतीय बौद्ध महासभा नवीन बिना व कार्यक्रम अध्यक्ष डॉ. जितेंद्र सावजी तागडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात



दिलेल्या समता, स्वातंत्र्य व बंधुत्वाची मुल्ये आपण सर्वांनी राष्ट्रात व समाजात रूजवली पाहिजे हिच महामानवाला खरी श्रद्धांजली होईल असे मत मांडले.

सायंकाळी बुद्ध वंदना घेतल्यानंतर सल्लागार समितीच्या लक्ष्मण लांजेवार, तुळशीराम बागडे, कृष्णाजी वासनिक, ओमप्रकाश गौरकर, किशोर चव्हाण, अशोक काबंळे, अभियंता उत्तम खोब्रागडे, अरुण नारनवरे, अशोक नारनवरे, यांच्या नेतृत्वात निळ्या पाखरांच्या थव्यांनी नवीन बिना वार्ड क्रमांक १ व २ मधून कँडल मार्च काढली.

विहाराच्या पटांगणात आल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाईच्या पूर्ण पुतळ्या समोर मेणबत्त्या लावून, समापन गाथा आणि महामानवाला श्रद्धांजली अर्पित करून कार्यक्रमाचे समापन करण्यात आले. यावेळी भानेगावच्या माजी सरपंच कविता बोरकर, सदस्य सोनाली बागडे, दर्शना बोरकर, भूषण गौरकर यांनीहि महामानवाला श्रद्धांजली वाहिली.

याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे उपाध्यक्ष अनिल लांजेवार, सचिव मुकेश बागडे. हिशोब तपासनिस नरेश डोंगरे, ज्ञानेश्वर ढोके, मिलींद गौरकर, पृथ्वीराज गोलाईत, आनंद वासनिक, अजय ढोरे, संजय बागडे, भानेगांव आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळाच्या कांता बागडे, सत्याफुला कांबळे, रेखा लांजेवार, नंदा सोमकुंवर, प्रभा लोखंडे, मीना ढोके, मिना रविन्द्र ढोके, वंदना गणवीर, मालवी नारनवरे, सारिका तागडे, रोहणी धनवटे, सुनंदा लांजेवार, लता खोब्रागडे, प्रिया डोंगरे, कल्पना वासनिक, आशा गौरकर, राहुल नवयुवक संघाचे अंकित लांजेवार, सोनू गणवीर, बॉबी गणवीर, सोनू ढोके, संकेत वाहने,आकाश वासनिक प्राचार्य अर्चना पाटील परिसरातील बाला–बालिका व नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रिती गोलाईत, संचालन कल्पना वासनिक तर आभार संचित गौरकर यांनी मानले.

# सगरोळी येथे शाँकसर्किटच्या आगीत कौलारु घर जळुन खाक लाखोंचे नुकसान

## दाग दागिने..नगदी रोकड.. रक्कमे सह संसार उपयोगी साहित्यांची राख रांगोळी

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०७, नांदेड :** बिलोली तालुक्यातील सगरोळी येथे कौलारू घराला विजेच्या शॉकसर्किटमुळे झालेल्या आगीच्या भडक्यात रहात्या घरासह कपाटातील दाग दागिने, नगदी रोकड व संसार उपयोगी साहित्याची राख रांगोळी झाल्याची घटना आज शनिवार रोजी दुपारच्या सुमारास घडली असुन यात शेतकरी कुटुंबाचे जवळपास २० ते २५ लाख रुपयाचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

सगरोळी येथील मध्यभागी असलेल्या दाट लोकवस्ती तील शेतकऱ्यांच्या कौलारू घराला विजेच्या शॉकसर्किटमुळे लागलेल्या आगीत येथील शेतकरी कुटुंबातील हनमंत दिगांबर सिद्धापुरे, बळवंत बाबाराव सिद्धापुरे, मारोती



बापूराव सिद्धापूरे,रेणुकाबाई बालाजी सिद्धापुरे, यांच्या घरास आज दि. ६ डिसेंबर शनिवार रोजी दुपारी बाराच्या सुमारास लागलेल्या आगीत हनमंत सिद्धापुरे या शेतकऱ्यांने नुकतंच सोयाबीन विकुन घरातील कपाटामध्ये ठेवलेली आडीच लाख रोकड व मौल्यवान दाग–दागिने कपाटासह जळुन खाक झाले. तसेच घरातील संसार उपयोगी साहित्य व अन्नधान्य व कौलारू घर यात जळून खाक झाले. ही आग विझवण्यासाठी गावकऱ्यांनी शर्तीचे प्रयत्न केले. पण आटोक्यात येत नसल्याने बिलोली येथील अग्निशमक दलास या बाबतची माहीती मिळताच तात्काळ अग्निशमक दल घटनास्थळी दाखल झाले व ही भडकलेली आग विझवण्यास कांहीं वेळानी गावकऱ्यांना व अग्निशमन दलाला यश आले. तो पर्यंत या आगीत भस्मसात झालेल्या या शेतकरी कुटुंबाच्या घरांतील संसार उपयोगी साहित्यांचे व अन्नधान्यांचे मोठे नुकसान झाले असून यात एकंदरीत जवळपास २० ते २५ लाख रुपयांचे नुकसानीचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या आगीमुळे उघड्यावर पडलेल्या या दुर्दैवी संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना शासनाकडून तात्काळ आर्थिक मदत करावी अशी मागणी गावकऱ्यांसह परीसरातील शेतकरी वर्गातून होत आहे. तर ही आग विझवण्यासाठी सगरोळीचे बिट जमादार आंबेराय सी. व्हि, पोलीस कर्मचारी शेख शबीर, राजू पाटील शिंपाळकर, शंकर महाजन, प्रभू मुत्येपोड,वैभव भोसले, शेख मुर्तुजा, भगवान पा. सिध्दापुरे,सुनिल खिरप्पवार अरविंद बुच्छलवार, सतीश बुच्छलवार, आदिनाथ बाबणे,कोंडापल्ली शंकर, विकास दमय्यावार, सचिन कल्लोड,सचिन बुच्छलवार, विठ्ठल चुन्नमवार, संजय चून्नमवार यांच्यासह शेकडो गावकऱ्यांनी सहकार्य केल्याने या दाट लोकवस्तीतील पुढील मोठा अनर्थ टळला.

# रेबीज निर्मूलनासाठी पनवेल महानगरपालिकेचा पुढाकार : पाळीव प्राण्यांचे मोफत लसीकरण

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०७, पनवेल :** शासन जर संवेदनशील असेल तर ते जनतेपर्यंत पोहचू शकते आणि जनतेची सेवा करू शकते. प्राण्यांच्या बाबतीतही संवेदनशील असलेल्या पनवेल महानगर पालिकेचे झिरो रेबीज निर्मुलन अभियान कौतुकास्पद आहे. पनवेल महापालिकेने या शिबिराच्या माध्यमातून पाळीव प्राण्यांना चांगल्या प्रकारे आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच महापालिकेने पाळीव श्वानांसाठी फिरते रूग्णालयही सुरू केले आहे.

अशा विविध सुविधांच्या माध्यमातून पनवेल अद्यावत शहर होण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सांगितले. पनवेल महानगरपालिका पशुवैद्यकीय विभागामार्फत आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली झिरो रेबीज निर्मूलन कार्यक्रमांतर्गत शहरातील सर्व पाळीव प्राण्यांसाठी मोफत रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरण व आरोग्य तपासणी शिबिर आज नवीन पनवेलमधील जागृती सभागृहात मिनीस्ट्री ऑफ पेट्स आणि महापालिका यांच्या संयुक्त विद्यमानातून आयोजित करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते.

यावेळी माजी महापौर डॉ.कविता चौतमोल, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.भगवान गीते, डॉ.मधुलिका लाड, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, वृषाली वाघमारे, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रीय पातळीवरील नॅशनल ॲक्शन फॉर डॉग मेडिकेटेड रेबीज इलिमेशन २०३० (छअझठए) अंतर्गत हा उपक्रम सुरू असून पनवेल महानगरपालिका शून्य रेबीज या उद्दिष्टाकडे वाटचाल करत आहे.भारतामध्ये दरवर्षी रेबीजमुळे मोठ्या प्रमाणात नागरिकांचे मृत्यू होत असून त्यापैकी बहुसंख्य प्रकरणे संक्रमित प्राण्यांच्या चाव्यामुळे होतात. रेबीज हा प्रतिबंधात्मक आजार असून प्राण्यांचे वेळेवर लसीकरण हा यावर सर्वात प्रभावी उपाय आहे. याच उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

यावेळी सुमारे २२५ पाळीव मांजरी व पाळीव श्वानांचे रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात आले. उपायुक्त प्रसेनजित कारलेकर व मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ आनंद गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाने या वर्षी सुमारे १५ हजार ६८९ भटक्या श्वानांचे लसीकरण केले आहे.

प्राणी जन्म नियंत्रण कार्यक्रमांतर्गत १ हजार ९८० भटक्या श्वानांचे व ३४५ भटक्या मांजरीचे लसीकरण करण्यात आले आहे. याच बरोबर पाळीव प्राण्यांना आरोग्य सेवा देण्यासाठी मोफत फिरत्या पशुवैद्यकीय दवाखानाचा आजवर १ हजारांहून अधिक पशु प्रेमींनी लाभ घेतला आहे. या फिरत्या पशुवैद्यकीय दवाखानाच्या मार्फत ६०० हून अधिक श्वान व मांजरीचे लसीकरण करण्यात आले आहे.

# थोडक्यात

## विसापूर ग्रामपंचायत तर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, विसापूर (चंद्रपूर) :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विसापूर ग्रामपंचायत मध्ये अभिवादन कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रमुख



अतिथी म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य रामभाऊ टोंगे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील प्रसंग सांगून त्यांच्या कार्याचा आढावा विशद केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच वर्षा कुळमेथे होत्या. यावेळी उपसरपंच अनेकश्वर मेश्राम, ग्रामपंचायत सदस्य शारदा डाहुले, रिना कांबळे, वैशाली पुणेकर, सुरेखा ईटनकर, हर्षला टोंगे, गजानन पाटणकर, दिलदार जयकर, सुनील रोंगे, ग्रामपंचायत अधिकारी गणेश कोकोडे, संतोष निपुंगे, राहूल टोंगे, अशोक ठुणेकर, सुरज डबरे यांची उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना रामभाऊ टोंगे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून प्रत्येक भारतीय नागरिकांना समान अधिकार, समानता, स्वातंत्र्य, सामाजिक, आर्थिक, राजकीय अधिकार दिले. त्यांनी मी प्रथम भारतीय व अंतिम भारतीय असल्याचे सांगितले आहे. हे त्यांची शिकवण सर्वांनी अंगिकारावी असे मनोगत व्यक्त केले.

## गोंडवाना विद्यापीठात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर (गडचिरोली) :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस प्र–कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे यांच्या हस्ते माल्यार्पण व पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी अधिसभा सदस्य डॉ. नरेश मडावी, सतिश पडोळे, ज्ञान स्त्रोत केंद्राच्या समन्वयक डॉ. रजनी वाढई,



उपकुलसचिव डॉ. कामाजी देशमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे सहसमन्वयक सहा. प्रा. रोहित बापू कांबळे उपस्थित होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दि. ८ रोजी सकाळी ११.३० वाजता डॉ. रविंद्र कांबळे यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक क्रांती या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले असून सदर व्याख्यानास नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन डॉ. श्रीराम कावळे यांनी अभिवादानंतर केले.याप्रसंगी डॉ. नंदकिशोर मने, डॉ. अनिरुध्द गचके, डॉ. देवदत्त तारे, डॉ. अपर्णा भाके, डॉ. प्रमोद जावरे, डॉ. अनंता गावंडे, डॉ. सरफराज अन्सारी, मनोज जाधव यांच्यासह अन्य प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## पेण तालुक्यात फॉर्मर कप शेतकरी प्रशिक्षण उत्साहात संपन्न

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०७, पेण (रायगड) :** महाराष्ट्र शासन कृषी विभाग व पानी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सत्यमेव जयते फार्मर कप' अंतर्गत नुकतेच महात्मा



गांधी वाचनालय येथे शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. तालुक्यातील विविध गावांतील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी पेण सागर वाडकर यांनी केले व फार्मर कप चे महत्व शेतकऱ्यांना पटवून दिले तसेच पुढे होणाऱ्या निवासी प्रशिक्षण व फार्मर कप मध्ये शेतकऱ्यांना सहभागी होण्याबाबत आवाहन केले. प्रशिक्षण सत्रात पाणी फाऊंडेशनच्या प्रतिनिधी आशिष लाड व भक्ती कुटे यांनी खरीप हंगाम २०२६ पासून सुरू होणाऱ्या 'फार्मर कप' स्पर्धेबाबत सविस्तर माहिती दिली. व विविध गटांच्या योशोगाथा व्हिडिओ चे माध्यमातून शेतकऱ्यांना दाखवण्यात आल्या. गटशेती ही काळाची गरज असून, गटाच्या माध्यमातून शेतीचा विकास, कमी खर्चात अधिक उत्पादन आणि शाश्वत शेतीच्या दिशेने वाटचाल शक्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या स्पर्धेसाठी तालुक्यातून निवडण्यात येणाऱ्या १०० शेतकऱ्यांना तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण दिले जाणार आहे. हे प्रशिक्षण इतके प्रेरणादायी व ज्ञानसंपन्न असणार आहे की हे शेतकरी गावी परत आल्या नंतर नक्कीच स्वतः चा शेतकरी गट तयार करून 'फार्मर कप' स्पर्धेत सहभागी होणार होतील अशी खात्री त्यांनी दिली. प्रशिक्षणात निवासी शिबिराची संपूर्ण माहिती देण्यात आली. उपस्थित शेतकऱ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून भविष्यात होणाऱ्या ३ दिवसीय निवासी प्रशिक्षणासाठी नोंदणी देखील केली आहे. तसेच ०५ डिसेंबर हा जागतिक मृदा दिन देखील यावेळी साजरा करण्यात आला. रायगड जिल्हा मृद चाचणी अधिकारी वायकुळे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना जमिनीच्या आरोग्याचे महत्व सांगून माती नमुना घेण्याच्या पद्धती बद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या उपक्रमाबद्दल उपस्थित शेतकऱ्यांनी कृषी विभाग व पाणी फाउंडेशन चे आभार देखील मानले.

## नांदेड रेल्वे स्थानकावर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०६, नांदेड :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त साउथ सेंट्रल रेल्वे एम्प्लॉइज संघ, नांदेड मंडळाच्या वतीने अभिवादन व श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नांदेड रेल्वे




स्थानकात झालेल्या या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमात संघाचे सचिव यू. वेंकटेश्वरलू, ओपन लाइन ब्रांचचे चेअरमन किरणकुमार जाधव, सचिव रवी कापूरे सी टी आय बेस इंचार्ज जी.मनोज, कृष्णेंदु, संजीव कुमार सीसीआय , मनोहर पवार सी पी एस आर, स्टेशन मॅनेजर अशुतोष कुमार, माजी स्टेशन मॅनेजर भिसे , कार्नींदे, गोडबोले, सुनील सालवे सी एस आर कपिल चौदंते, प्रभाकर भोले, यांच्यासह अन्य मान्यवरांची उपस्थिती होती . मिलिंद लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली अभिवादन कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. साउथ सेंट्रल रेल्वे एम्प्लॉइज संघ, नांदेड मंडळाच्या वतीने कार्यक्रमाला उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानण्यात आले.